# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दि. ०७/१२/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या १३८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत :

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री.के.बी.गवळी, | .. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ |
| २. | मा.श्री.विश्वास उपासे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ३. | मा.श्री.मकरंद सावे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ४. | मा.श्री.साहेबराव खरात. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ५. | मा.श्री.वामनराव राऊत. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ६. | मा.ॲड.श्री.जे.पी.पाटील. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ७. | मा.श्रीमती.शैलेजा गायकवाड. | .. | सदस्या/औरंगाबाद मंडळ. |
| ८. | मा.श्री.चांदपाशा इनामदार | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ९. | मा.श्री.राजेश्वर चव्हाण. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| १०. | मा.श्री.संजय वाघचौरे | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ११. | मा.श्री.बबनराव देशमुख. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| १२. | मा.श्री.एस.ए.पवार<br>सहा.नगर रचनाकार<br>उप संचालक नगर रचना कार्यालय, औरंगाबाद. | .. | सदस्य प्रतिनिधी. |
| १३. | श्री.बी.के.परदेशी.<br>शाखा अभियंता, म.न.पा.<br>महानगरपालिका, औरंगाबाद. | .. | सदस्य प्रतिनिधी. |

बैठकीचे कामकाज सुरु होण्यापूर्वी, मा.मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थित मा.सदस्य यांना माहिती दिली की, मा.सभापती, औरंगाबाद मंडळ हे विधी मंडळाचे अधिवेशन असल्यामुळे बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत व मा.सभापती यांनी दुरध्वनीवरुन बैठक घेण्याच्या सुचना दिल्यानुसार व म्हाड कायदा १९७६ मधील कलम २५, २६, व २७ मधील तरतुदीनुसार मुख्य अधिकारी तथा उप सभापती यांचे अध्यक्षतेखाली मंडळाची १३८ वी बैठक घेण्यांत येत आहे. उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले. बैठक सुरु होण्यापूर्वी मा.सदस्य श्री मकरंद सावे यांनी प्रतिपादन केले की, महाराष्ट्र राज्याचे नव नियुक्त मुख्यमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख व महाराष्ट्र राज्याचे नव नियुक्त उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचा अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्या बाबत त्यांचे या मंडळातर्फे "अभिनंदन " करण्यांत यावे असा ठराव मांडला व त्यास मंडळाचे मा.सदस्य श्री.चाँदपाशा इनामदार यांनी अनुमोदन दिले. तसेच सदर ठरावाची प्रत मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पाठविण्यात यावे.व त्यानुसार मंडळाचे सर्व सदस्यांनी त्यास अनुमोदन दिले व निर्णय घेतला की,

**<u>ठराव क्रं.८१२ :</u> "महाराष्ट्र राज्याचे नव-नियुक्त मुख्यमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख व नव-नियुक्त उप मुख्यमंत्री मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचा अनुक्रमे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री पदांचा कार्यभार स्विकारल्या बद्दल हार्दीक अभिनंदन."**

# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या दि. ०७/१२/२००४ रोजी सकाळी ११.०० वाजता झालेल्या १३८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत :

सदर बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.श्री.के.बी.गवळी, | .. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ |
| २. | मा.श्री.विश्वास उपासे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ३. | मा.श्री.मकरंद सावे. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ४. | मा.श्री.साहेबराव खरात. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ५. | मा.श्री.वामनराव राऊत. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ६. | मा.ॲड.श्री.जे.पी.पाटील. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ७. | मा.श्रीमती.शैलेजा गायकवाड. | .. | सदस्या/औरंगाबाद मंडळ. |
| ८. | मा.श्री.चांदपाशा इनामदार | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ९. | मा.श्री.राजेश्वर चव्हाण. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| १०. | मा.श्री.संजय वाघचौरे | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| ११. | मा.श्री.बबनराव देशमुख. | .. | सदस्य/औरंगाबाद मंडळ. |
| १२. | मा.श्री.एस.ए.पवार<br>सहा.नगर रचनाकार<br>उप संचालक नगर रचना कार्यालय, औरंगाबाद. | .. | सदस्य प्रतिनिधी. |
| १३. | श्री.बी.के.परदेशी.<br>शाखा अभियंता,म.न.पा.<br>महानगरपालिका,औरंगाबाद. | .. | सदस्य प्रतिनिधी. |

बैठकीचे कामकाज सुरु होण्यापूर्वी, मा.मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी सर्व उपस्थित मा.सदस्य यांना माहिती दिली की, मा.सभापती, औरंगाबाद मंडळ हे विधी मंडळाचे अधिवेशन असल्यामुळे बैठकीस उपस्थित राहू शकणार नाहीत व मा.सभापती यांनी दुरध्वनीवरुन बैठक घेण्याच्या सुचना दिल्यानुसार व म्हाड कायदा १९७६ मधील कलम २५, २६, व २७ मधील तरतुदीनुसार मुख्य अधिकारी तथा उप सभापती यांचे अध्यक्षतेखाली मंडळाची १३८ वी बैठक घेण्यांत येत आहे. उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले. बैठक सुरु होण्यापूर्वी मा.सदस्य श्री मकरंद सावे यांनी प्रतिपादन केले की, महाराष्ट्र राज्याचे नव नियुक्त मुख्यमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख व महाराष्ट्र राज्याचे नव नियुक्त उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचा अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पदाचा कार्यभार स्विकारल्या बाबत त्यांचे या मंडळातर्फे "अभिनंदन" करण्यांत यावे असा ठराव मांडला व त्यास मंडळाचे मा.सदस्य श्री.चाँदपाशा इनामदार यांनी अनुमोदन दिले. तसेच सदर ठरावाची प्रत मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना पाठविण्यात यावे.व त्यानुसार मंडळाचे सर्व सदस्यांनी त्यास अनुमोदन दिले व निर्णय घेतला की,

**ठराव क्रं.८१२ :** "महाराष्ट्र राज्याचे नव-नियुक्त मुख्यमंत्री मा.ना.श्री.विलासरावजी देशमुख व नव-नियुक्त उप मुख्यमंत्री मा.ना.श्री.आर.आर.पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचा अनुक्रमे मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री पदांचा कार्यभार स्विकारल्या बद्दल हार्दीक अभिनंदन."

यानंतर मंडळाचे १३८ व्या बैठकीच्या कामकाजास सुरुवात करण्यांत आली.

**विषय क्रं.१ :- दि.१६/८/२००४ रोजी झालेल्या मंडळाच्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**

दिनांक १६/८/२००४ रोजी मंडळाच्या १३७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांता विषयी व घेतलेल्या ठरावा विषयीची सविस्तर माहिती मंडळाचे उप अभियंता तथा मुख्याधिकारी यांचे स्विय सहाय्यक श्री.आर.के.पाटील यांनी मंडळास दिली व त्यावर सांगोपांग चर्चा करण्यांत आल्यानंतर, मंडळाच्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत उपरोक्त ठरावासह कायम करण्यासाठी सर्वानुमते निर्णय घेतला की,

**ठराव क्र.८१३.**

दिनांक १६/८/२००४ रोजी झालेल्या मंडळाच्या १३७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत उपरोक्त ठरावासह कायम करण्यांत आला.

**विषय क्रं.२ :- सन २००४-०५ मधील सुधारित बांधकाम कार्यक्रम तसेच २००५-०६ मधिल प्रस्तावित बांधकाम कार्यक्रम, राष्ट्रिय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास योजने बाबत आढावा.**

सदर विषयात नमुद केल्याप्रमाणे मंडळाच्या सन २००४-०५ मधिल सुधारित बांधकाम कार्यक्रमा विषयी व सन २००५-०६ मधिल प्रस्तावित बांधकाम कार्यक्रम / वॅम्बे योजना व राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यकमाच्या कामाच्या प्रगती बाबतची माहिती मंडळासमोर सादर करण्यासाठी मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, औरंगाबाद विभाग व लातूर विभाग यांना सांगितले. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता औरंगाबाद विभाग व कार्यकारी अभियंता लातूर विभाग यांनी त्यांचे विभागातील उपरोक्त योजनेतील कामांच्या प्रगतीची सविस्तर माहिती मंडळासमोर नमुद केली.

याबाबतीत मंडळाने सर्वानुमते उपरोक्त योजनेतील कामाच्या प्रगतीची नोंद घेतली व मंडळाच्या सदस्यांनी सर्वानुमते असेही सुचविले की, उपरोक्त योजना परिणामकारकरित्या राबवून मंडळास दिलेले उद्दिष्ट साध्य करावे.

सांगोपांग चर्चेअंती मंडळाने निर्णय घेतला की,

**ठराव क्रं.८१४ :**

सन २००४-०५ मधील सुधारित बांधकाम कार्यक्रम तसेच २००५-०६ मधिल प्रस्तावित बांधकाम कार्यक्रमातील मंडळाच्या विविध योजना जसे की, गृहनिर्माण योजना, राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार कार्यक्रम व वाल्मिकी आंबेडकर आवास या योजनेचे दोन्ही कार्यकारी अभियंता यांनी वार्षिक उद्दिष्ट साध्य करावे.

## मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचा विषय :

## आयत्या वेळेचे विषय क्रं.१ : मागणी अभावी रिक्त असलेल्या गाळयांच्या किंमती कमी करणे तसेच कमी केलेल्या किंमतीचे गाळे भाडे खरेदी हप्त्याने विक्रीस परवानगी बाबत.

याबाबतीत मुख्याधिकारी यांनी अशी माहिती दिली की, मंडळाअंतर्गत राबविण्यांत आलेल्या योजनेपैकी तिसगांव, वाळूज (औरंगाबाद), कवठा (नांदेड), उदगिर (लातूर), गेवराई (बीड) या योजनेतील रिक्त गाळयांची विल्हेवाट लावण्याचे दृष्टीने यापूर्वी त्या गाळयांच्या किंमती या कार्यालयाचे प्रस्तावानुसार प्राधिकरणाचे दि. २९/०७/२००४ चा ठराव क्र.६०३९ अन्वये कमी केलेल्या आहेत. त्याप्रमाणे उक्त ठरावानुसार कमी केलेल्या किंमती आधारे सदर रिक्त गाळयांची विल्हेवाट लावणेसाठी एक रक्कमी पध्दतीने "प्रथम येणारास प्रथम प्राधान्य " या तत्वावर जाहिरात देणेत आली. तसेच संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, महानगर पालिका, औरंगाबाद, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना पत्राद्वारे सदर रिक्त गाळयांची व कमी केलेल्या किंमतीबाबतची माहिती देण्यांत येवून, त्यांचे अधिनस्त कर्मचारी सदर गाळे घेण्यास इच्छुक असल्यास, त्याप्रमाणे कार्यवाहीची विनंती करण्यांत आली. त्याचप्रमाणे औरंगाबाद येथिल रिक्त गाळयांचे बाबतीत महानगर पालिका, औरंगाबाद येथे बॅनर लावून माहिती दिली.तसेच औरंगाबाद केबल नेटवर्कद्वारे शहरवासियांना माहिती दिली. तथापि, वरिल प्रमाणे प्रयत्न करुनही गाळयांची विक्री होवू शकलेली नाही. सदरील गाळे विक्री न होण्याचे बाबतीत मुख्याधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, तिसगांव येथील कमी केलेल्या किंमतीही बाजारभावापेक्षा थोडयाफार जास्त वाटतात. तसेच लोक एकरक्कमी तत्वावर घरे घेण्यास इच्छुक नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे तिसगांव येथिल ४५३ गाळे अल्प उत्पन्न गट व ३८ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेतील रिक्त गाळयांच्या किंमती आणखी कमी केल्यास व गाळे भाडेखरेदी तत्वावर वाटप केल्यास, गाळे विक्री होऊ शकतील. त्यामुळे गाळयांच्या किंमती कमी करुन (जाहिर झालेल्या किंमतीमधून व्याज, आस्थापना खर्च व नफा वगळून व तसेच भू व भूविकास खर्चावर २० टक्के अनुदान देवून येणारी किंमत) विक्री किंमतीच्या ८० टक्के कर्ज गाळे वाटपापासून १० वर्षांचा परतफेडीचा कालावधी देवून प्रचलित व्याजदराने व २० टक्के रक्कम गाळे ताब्यात देण्यापूर्वी वसूल केल्यास औदयोगिक क्षेत्रात काम करणारे कामगार, रोजंदारी कामगार व मजूरी करणारे वर्ग सदर गाळे घेण्यास पुढे येऊ शकतील. त्याचप्रमाणे औरंगाबाद, एमआयडीसी वाळूज, गेवराई जि.बीड, कौठा-नांदेड, उदगीर जि.लातूर येथिल रिक्त गाळे हे, अगोदर कमी केलेल्या किंमतीतच परंतु भाडेखरेदी तत्वावर व गाळयांच्या किंमतीच्या ८० टक्के रक्कम कर्ज म्हणून उपलब्ध करुन देऊन प्रचलित व्याजदराने व २० टक्के रक्कम गाळा ताब्यात घेण्यापूर्वी वसूल केल्यास, याही ठिकाणच्या रिक्त गाळयांस मागणी येऊ शकेल, अशी माहिती मुख्याधिकारी यांनी मंडळास दिली. म्हणून तिसगांव येथिल ३८ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेतील गाळयाची किंमत रु.२,०३,५००/- वरुन रु.१,६७,०००/- अशी करणे व ४५३ गाळे अल्प उत्पन्न गट योजनेतील गाळयांची किंमत रु.९७,५००/- वरुन रु.८२,५००/- करणे बाबतचा प्रस्ताव व औरंगाबाद, एमआयडीसी वाळूज, गेवराई, कौठा, उदगीर येथिल रिक्त गाळे (रिक्त गाळयांचा तपशिल, बाब टिपणीमध्ये नमुद केल्याप्रमाणे) पूर्वीच्या कमी केलेल्या किंमतीत एकरक्कमी किंमती ऐवजी, भाडेखरेदी तत्वावर विक्री केल्यास, सदर रिक्त गाळेही विक्री होऊ शकतील. म्हणून असे दोन्ही प्रस्ताव मंडळा समोर विचारार्थ व मंजूरीस्तव सादर केले व सदर प्रस्तावास मंडळाने मंजूरी दिल्यास, त्याप्रमाणे त्यास प्राधिकरणाची मंजूरी घेण्यासाठीचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यांत येईल, असे मुख्य अधिकारी यांनी मंडळास सांगितले.

या बाब टिपणी विषयी मंडळाचे सर्व मा.सदस्य यांनी सर्वानुमते प्रतिपादन केले की, गाळयांची विक्री व्हावी म्हणून व त्यामध्ये अडकून पडलेला निधी मोकळा व्हावा म्हणून, बाब टिपणीत नमुद केल्याप्रमाणे तिसगांव औरंगाबाद येथिल ३८ गाळयांच्या कमी केलेल्या किंमतीस म्हणजेच रु.१,६७,०००/- व रु.८२,५००/- तसेच ४५३ गाळे अल्प उत्पन्न गटासाठी याप्रमाणे किंमतीनुसार गाळे विक्री करण्यास व गाळयाच्या किंमतीच्या ८० टक्के कर्ज उपलब्ध करुन देणे व २० टक्के रक्कम गाळा ताब्यात देण्यापूर्वी घेण्यास व तसेच औरंगाबाद, एमआयडीसी वाळूज, गेवराई, कौठा-नांदेड व उदगीर येथिल बाब टिपणीत नमुद केलेले रिक्त गाळे हे पूर्वीच्याच कमी केलेल्या किंमतीत परंतु एकरक्कमी खरेदी ऐवजी, भाडेखरेदी तत्वावर व गाळयाच्या किंमतीच्या ८० टक्के कर्ज उपलब्ध करुन देणे व २० टक्के रक्कम गाळा ताब्यात देण्यापूर्वी घेण्याच्या तत्वावर गाळे विक्री करण्यास मंडळाची काहीही हरकत नाही. तथापि, सदर गाळे विक्री करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यांत यावे, असे मंडळाने सुचविले व उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे पाठविण्यासाठी मंडळाने सर्वानुमते निर्णय घेतला.

प्रस्तूत बाब टिपणीतील विषयाबाबत मंडळाने वरिल प्रमाणे सांगोपांग चर्चा करुन सर्वानुमते निर्णय घेतला की,

**ठराव क्रं. ८१५ :**

**१. तिसगांव औरंगाबाद येथिल ४५३ गाळे अल्प उत्पन्न गट योजना व ३८ गाळे मध्यम उत्पन्न गट योजना, या दोन्ही योजनेतील गाळयांच्या आणखी कमी केलेल्या किंमतीस अनुक्रमे रु.१,६७,०००/- व रु.८२,५००/- प्रमाणे भाडेखरेदी तत्वावर (गाळयांच्या किंमतीच्या ८० टक्के रक्कम, कर्ज म्हणून प्रचलित व्याजदराने उपलब्ध करुन देऊन व २० टक्के रक्कम गाळा ताब्यात देण्यापूर्वी वसूल करुन) गाळे विक्री व कर्ज परतफेड गाळा वाटप झाल्यापासून १० वर्षांच्या कालावधीत करण्यास मंजूरी देण्यांत येत आहे.**

**२. वाळूज येथिल ४२ गाळे मध्यम उत्पन्न गट, औरंगाबाद येथिल ४८ गाळे मध्यम उत्पन्न गट व १६ गाळे मध्यम उत्पन्न गट, कौठा-नांदेड येथिल १९७ गाळे अल्प उत्पन्न गट, उदगीर येथिल १५४ गाळे अल्प उत्पन्न गट व ०४ गाळे अल्प उत्पन्न गट आणि गेवराई येथिल १०० गाळे अत्यल्प उत्पन्न गट व १८ गाळे अल्प उत्पन्न गट या योजनेतील रिक्त गाळे पूर्वीच्याच कमी केलेल्या किंमतीत, परंतू एकरक्कमी पध्दती ऐवजी, भाडेखरेदी तत्वावर (८० टक्के रक्कम कर्ज म्हणून प्रचलित व्याजदराने उपलब्ध करुन देणे व २० टक्के रक्कम गाळा ताब्यात घेण्यापूर्वी वसूल करणे) विक्री व कर्ज परतफेड गाळा वाटप झाल्यापासून १० वर्षांच्या कालावधीत करण्यासाठी मंजूरी देण्यांत येत आहे.**

**वरिल दोन्ही प्रस्ताव प्राधिकरणाकडे मंजूरीसाठी पाठविण्याची कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी. या ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता पूढील कार्यवाही त्वरीत करण्यांत यावी.**

**आयत्या वेळचे विषय क्र. २ : औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने गंगाखेड रोड, परभणी येथे बांधलेल्या गाळयांचे वाटप नगर परिषद, परभणी येथील कर्मचा-यांना हप्ते पध्दतीने करणेबाबत.**

या विषया बाबत मुख्य अधिकारी / औरंगाबाद मंडळ यांनी मंडळास माहिती दिली की, मंडळाने परभणी येथे २५ गाळे अल्प उत्पन्न गट व १५ गाळे मध्यम उत्पन्न गट गाळे जवळपास १० वर्षापूर्वी बांधले परंतु आतापर्यंत गाळे विक्री झाले नाहीत. रिक्त गाळयांची विक्री व्हावी म्हणून गाळयांच्या किंमती प्राधिकरणाचे दि. २१/०४/२००३ चे ठराव क्रमांक ५९०३ अन्वये ५० टक्के कमी केल्या असुन सदर कमी केलेल्या किंमतीत घरांचे विक्रीसाठी एकरक्कमी पध्दतीने "प्रथम येणारास प्रथम प्राधान्य " या तत्वावर जाहिरात देण्यांत आली. तसेच मोक्याचे ठिकाणी बॅनर्स लावण्यात आले. शिवाय जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पोलीस अधिक्षक परभणी यांना पत्र देवून त्यांचे अधिनस्त कर्मचा-यांसाठी गाळे घेण्याबद्दल विनंती, तथापि अदयाप एकही घर विक्री होवु शकले नाही. तथापी आता नगर परिषद परभणीचे मुख्याधिकारी यांनी त्यांचे दि. २४/११/२००४ चे पत्र क्र.८२४/४ अन्वये सदरील गाळे त्यांचे कर्मचारी हप्ता पध्दतीने घेण्यास तयार असल्याचे कळवले असून, त्यामध्ये त्यांनी असा खुलासा केला आहे की, मध्यम उत्पन्न गटाचे गाळयांकरिता सुरुवातीला रु.१०,०००/- व अल्प उत्पन्न गटातील गाळयांकरिता सुरुवातीला रु.५०००/- भरण्यास कर्मचारी तयार आहेत. तसेच दरमहा अनुक्रमे रु.१०००/- व रु.५००/- त्यांचे पगारातून हप्ते कपात करुन भरण्यांत येतील असेही कळवले आहे. तेंव्हा रिक्त गाळे विक्री होवून त्यातला अडकलेला निधी मोकळा होण्यासाठी व गाळयांचे संभाव्य नुकसान टाळावे, म्हणून उपरोक्त नमुद प्रमाणे हप्ते पध्दतीने गाळे नगर परिषद परभणीच्या कर्मचा-यांना विक्री करण्यासाठीचा प्रस्ताव मंजूरीस्तव मंडळासमोर सादर केला आहे, असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

मंडळाचे सर्व मा.सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले की, मंडळाच्या गाळयांत अडकलेला निधी मुक्त होणेसाठी व गाळयांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांची विल्हेवाट त्वरित लावण्याच्या हेतूने, परभणी येथिल उपरोक्त नमुद योजनेतील रिक्त गाळे, नगर परिषद, परभणीच्या कर्मचा-यांना बाब टिपणीत नमुद केल्याप्रमाणे मासिक हप्ते पध्दतीने वाटप करण्यास हरकत नाही. त्याप्रमाणे सदर प्रस्तावास प्राधिकरणाची मान्यता घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी, असेही मंडळाने सर्वानुमते सांगितले.

वरिल प्रमाणे चर्चा झाल्यानंतर प्रस्तुत विषयावर मंडळाने एकमताने निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ८१६ :** परभणी (गंगाखेड रोड) येथिल २५ गाळे अल्प उत्पन्न गट व १५ गाळे मध्यम उत्पन्न गट योजनेतील रिक्त गाळे नगर परिषद परभणीच्या कर्मचा-यांना वाटप करण्यासाठी प्राधिकरणाने यापूर्वी मंजूर केलेल्या गाळयांच्या किंमतीपैकी, मध्यम उत्पन्न गटासाठी सुरुवातीस रु.१०००/- व अल्प उत्पन्न गटासाठी सुरुवातीस रु.५०००/- घेऊन उर्वरित रक्कम प्रचलित व्याजदरासह हप्त्याने कर्मचा-यांच्या मासिक वेतनातून, नगर परिषद, परभणी मार्फत वसूल करण्यासाठी मान्यता देण्यांत येत आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे तात्काळ पाठविण्यांत यावा व मंजूरीनंतरच गाळे वाटप करण्यांत यावे व सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

**आयत्या वेळेचे विषय क्रमांक ३ : सहयोगनगर, नांदेड मंडळाच्या वसाहतीतील सुविधा भूखंडाच्या निविदा मंजूरी बाबत.**

या विषयाच्या बाबतीत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, सहयोग नगर नांदेड येथे मंडळाने विविध योजना राबवून गाळे वाटप केले, परंतु वसाहतीमधील सुविधांसाठी आरक्षीत असलेले तीन भूखंड (बाब टिप्पणीत सविस्तरपणे नमुद केल्याप्रमाणे) विक्रीसाठी प्रयत्न केले व तीन भूखंडापैकी दुकानासाठीचा आरक्षीत भूखंड सन २००३ मध्ये विक्री झाला. उर्वरित दोन भूखंड महानगरपालिका, नांदेड यांना घ्यावेत म्हणून पत्रव्यवहार केला परंतु महानगरपालिका, नांदेड यांनी दोन भूखंड (बालवाडीसाठीचा भूखंड व सुविधा भूखंड) घेण्यासाठी संम्मती दिली नाही, व तसेच सदर सुविधा भूखंडांवर मंडळा मार्फत दुकाने + रहिवासी गाळयांची योजना प्रस्तावित करुन, त्याच्या बांधकाम परवानगीसाठी महानगरपालिकेकडे प्रस्ताव पाठविला असता, त्यासही महानगरपालिकेने मंजूरी दिली नाही. तद्नंतर सदरील भूखंड निविदा पध्दतीने, विक्रीसाठी माहे ऑक्टो-२००३ मध्ये जाहिरात दिली असता, भूखंडास प्रतिसाद मिळाला नाही. सदर दोन भूखंड अदयाप रिक्त आहेत. करिता सदर दोन रिक्त भूखंडांवर अतिक्रमण होऊ नये व मंडळास निधी मिळावा, यासाठी बालवाडीसाठीचा (प्राथमिक शाळा) भूखंड नोंदणीकृत शैक्षणिक संस्थेस विक्रीस्तव विहीत नमुन्यातील अर्ज मागविणेस्तव व सुविधा भूखंडाची विक्री निविदा पध्दतीने, एक रक्कमी खरेदी तत्वावर होणेसाठी माहे ऑक्टो-२००४ मध्ये जाहिरात दिली असता, बालवाडीसाठी एकही अर्ज प्राप्त झाला नाही व सुविधा भूखंडासाठी दोन निविदा भरुन आल्या. त्याचा सविस्तर तपशिल बाब टिपणीत नमुद केला आहे. दोन प्राप्त निविदांपैकी श्री.किशनराव आठवले, यांची निविदा जास्तीच्या दराची म्हणजे रु.३९२८/- प्रति चौ.मी. दर (रु.१०९१९८४/-) प्राप्त झाली आहे व हा दर निविदेत दर्शविलेल्या दरापेक्षा रु.४६३/- प्रति चौ.मी. ने जास्त असून (१३.३६% जास्त) दुसरे निविदाकार श्री.हुसेनखान अलीखान यांनी भरुन दिलेल्या दरापेक्षा जास्त आहे करिता श्री.किशनराव ऊकंडजी आठवले यांची निविदा स्विकाराण्यांत यावी. प्राधिकरणाचे धोरणानुसार अनिवासी भूखंडाचे वितरणाचे अधिकार विभागीय मंडळास असल्यामुळे सदर बाब मंडळाचे विचारार्थ व मान्यतेस्तव सादर केली आहे, अशी माहिती मुख्य अधिकारी यांनी मंडळासमोर सादर केली.

प्रस्तुत बाबतीत मंडळाने सर्वानुमते प्रतिपादन केले की, रिक्त पडलेल्या सुविधा भूखंडांवर अतिक्रमण होवू नये व तसेच भूखंड विक्रीतून मंडळास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, सुविधा भूखंडांसाठी प्राप्त झालेल्या दोन निविदांपैकी श्री.किशानराव ऊकंडजी आठवले यांची मंडळाच्या किमान अपेक्षीत दरापेक्षा रु.४६३/- प्रति चौ.मी. (१३.३६% जास्तीचा दर) दराची निविदा असल्यामुळे, प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या नियमानुसार ती स्विकारण्यास हरकत नाही.

वरिल प्रमाणे प्रस्तुत बाब टिप्पणीतील विषयावर चर्चा झाल्यानंतर, मंडळाने सर्वानुमते खालील प्रमाणे निर्णय घेतला की,

**ठराव क्रमांक ८१७ :** सहयोग नगर, नांदेड येथिल सुविधा भूखंडासाठी श्री.किशनराव ऊकंडजी आठवले यांची निविदा जी की, मंडळाच्या किमान अपेक्षित दरापेक्षा/निविदेत दर्शविलेल्या दरापेक्षा रु.४६३/- प्रति मी.जास्त (रक्कम रु.१०,९१,९८४/- )(१३.३६% जास्त दर ) दराची निविदा असल्यामुळे ती स्विकारण्यांत यावी व त्याप्रमाणे सुविधा भूखंड वाटपाची कार्यवाही करावी. सदर ठरावाच्या स्थायीकरणाची वाट न पाहता कार्यवाही करावी.

## आयत्या वेळेचे विषय क्रमांक ४ : राष्ट्रीय गृहनिर्माण कार्यक्रमांतर्गत भूखंड क्रमांक आर-१ एमआयडीसी क्षेत्र अंबड जि.जालना येथे अत्यल्प उत्पन्न गट २०९ पैकी २०४ व अल्प उत्पन्न गट ३२ पैकी २२ गाळे बांधणे. निविदेवर निर्णय घेणे बाबत.

प्रस्तुत विषया संबंधी अंबड येथिल गृहनिर्माण योजनेतील गाळे बांधण्याच्या कामासाठी कंत्राटदार श्री.अरुण अग्रवाल, जालना यांनी योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १३.१३ टक्के कमी दराने भरलेल्या निविदेला मुख्य अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी सुरुवात केली असता मंडळाचे सर्व मा.सदस्य यांनी सर्वानुमते सांगितले की, कंत्राटादार श्री.अरुण अग्रवाल यांची निविदा जरी निम्नतम दराची असली तरी ती योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १३.१३ टक्के कमी दराची आहे व अशा कमी दराने भरलेल्या निविदेच्या कंत्राटदाराकडून बांधकामाची गुणवत्ता उत्कृष्ठ राहिल काय व अशा कमी दरात कंत्राटदार कशा प्रकारे बांधकाम करेल याचा सविस्तर खुलासेवार तपशिल कंत्राटदाराकडून घेवून मंडळासमोर ठवणे आवश्यक आहे व असा तपशील आल्यानंतर निविदेच्या स्विकृतीबाबत विचार करणे सुलभ होईल, म्हणून सदर विषय तुर्त स्थगित ठेवून मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवण्यांत यावा असे मंडळाने सर्वानुमते सांगितल्यावरुन प्रस्तुत विषय पूढील बैठकीत ठेवण्याचे ठरले.

उपरोक्त विषया बाबत श्री.पांडे, उप अभियंता जालना यांनी बैठकीत मंडळासमोर नमुद केले की, सदर कामाच्या निविदेच्या वैधतेचा कालावधी (Validity period) हा दि.१५/१२/२००४ पर्यंतच असून सदर ठेकेदार वैधता कालावधी पुढे वाढवून देण्याची शक्यता नाही व निविदा रदद करुन परत निविदा बोलविण्याची वेळ येवू शकेल कारण याआधी एकदा वैधता कालावधी वाढवून दिला आहे. त्यामुळे सदर निविदाबाबत मंडळाने निर्णय या बैठकीत न घेतल्यास अडचणी निर्माण होवू शकतील. याबाबत मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य यांनी प्रतिपादन केले की, वैधतेचा कालावधी (Validity period) वाढवून दिला नाही तर कामासाठी फेरनिविदा मागविण्याचा विचार करण्यांत येईल. सबब सदर विषय मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवण्याचे ठरले. मंडळाने सुचविल्यानुसार प्रस्तुत विषय मंडळाच्या आगामी बैठकीत ठेवण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

## आयत्या वेळेचा विषय क्रमांक ५ : श्री.एन.व्ही.डेकाटे, उप अभियंता,नांदेड उप विभाग यांची बदली इतर मंडळात करणे बाबत.

मा.सदस्य अॅड.जे.पी.पाटील यांनी बैठकीत उपरोक्त विषय मा.अध्यक्षांच्या परवानगीने मांडला व प्रतिपादन केले की, मंडळाचे नांदेड येथिल उप अभियंता श्री.डेकाटे हे सदस्यांशी उध्दटपणे बोलतात व सदस्यांना माहिती देत नाहीत व कार्यालयात कार्यालयीन वेळेत नियमित बसत नाहीत. जनतेच्या तक्रारी आहेत की ते जनतेशी सौजन्याने वागत नाही व महितीही देत नाहीत व कामही करित नाहीत.मा.सदस्य श्री.उपासे यांनी देखिल सांगितले की, उस्मानाबाद येथे असतांनाही त्यांनी काहीही कामे केली नसल्यामुळे त्यांची बदली नांदेड येथे करण्यांत आली होती तरीपण त्यांचे वागणूकी व कामामध्ये सुधारणा झाल्याचे दिसत नसल्याने त्यांची बदली मंडळाच्या कार्यकक्षेच्या बाहेर करण्यांत यावी. याबाबत मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते निर्णय घेतला की, श्री.डेकाटे, उप अभियंता नांदेड त्यांची बदली मंडळाच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर करण्यासाठी मुख्य अधिकारी / ओरंगाबाद मंडळ यांनी प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करावा याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल मंडळाचे बैठकीत ठेवण्यांत यावा असे सर्वानुमते बैठकीत ठरले.

**<u>ठराव क्रमांक ८१८ :</u>नांदेड उप विभागातील उप अभियंता श्री.एन.व्ही.डेकाटे हे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे गैरवर्तन व कामाची शिथिलता लक्षात घेता त्यांची बदली इतर मंडळात करण्यांत यावी.**

**<u>उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषय संपल्यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने मा.सदस्यांनी खालील मुद्दे उपस्थित केले :-</u>**

१.मंडळाचे मा.सदस्य श्री.वाघचौरे व सौ.गायकवाड यांनी सांगितले की, मंडळाच्या वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या गाळे/भूखंड विक्रीच्या जाहिराती व बांधकामाच्या निविदाच्या प्रसिध्दीच्या जाहिराती इ. जाहिरातीच्या प्रती त्यांना वेळेवर मिळत नाही त्यामुळे त्यांना गाळे / भूखंडाच्या जाहिरातीबाबत व निविदा बाबत माहिती उपलब्ध होत नाही. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले. मंडळाचे सर्व मा.सदस्यांना गाळे / भूखंड विक्रीच्या जाहिरातीची प्रत व निविदा प्रसिध्दीच्या जाहिरात प्रत लवकरात लवकर पाठविणेसाठी संबंधितांना सूचना देण्यांत आल्या.

२.मा.सदस्य श्री.इनामदार व ॲड. जे.पी.पाटील यांनी सांगितले की, लातूर (बाभूळगांव रोड) येथिल व सहयोग नगर नांदेड येथिल बालवाडी/शाळेसाठीच्या आरक्षीत सुविधा भूखंडाची जाहिरात देण्यांत यावी. सदर सुविधा भूखंडाची जाहिरात देण्याची कार्यवाही करण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

३.मा.सदस्य ॲड.जे.पी.पाटील यांनी प्रतिपादन केले की, नांदेड जिल्हयात ग्रामीण भागात खालील २२ ठिकाणी मंडळाच्या गृहनिर्माण योजना राबविणेसाठी कार्यवाही करण्यांत यावी असे सुचविले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. सांगली (ता.नायगांव ) | २. कोकलेगांव. | ३. कंटूर. | ४.घुगराळा. |
| ५. बरबडा. | ६. अर्धापूर. | ७. बारड. | ८. लोहगांव |
| ९.कोंडलवाडी. | १०.उमरी. | ११.भोकर | १२.हदगांव. |
| १३.किनवट. | १४. इस्लामपूर(ता.किनवट. ) | १५.हिमायतनगर | १६. धर्माबाद. |
| १७. बिलोली. | १८.कंधार | १९.लोहा | २०.हळदा |
| २१. चिखली. | २२.कुष्णूर. | | |

या बाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, उपरोक्त गावांच्या ठिकाणी योग्य अशा शासकीय जमिनीची पाहणी करण्यांत येईल व शासकीय जमिन उपलब्ध नसल्यास (खाजगी जमिनी) उपलब्धते बाबत संबंधीत कार्यकाकरी अभियंता/उप अभियंता यांचेकडून अहवाल घेऊन त्यानुसार प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करण्यांत येईल.

४. मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी प्रतिपादन केले की, लातूर शहरालगत मडळाने विकसीत भूखंडाच्या योजना राबविणेसाठी कलम-५२ खाली जमिनी घेण्याची कार्यवाही करावी. मुख्य अधिकारी यांनी सांगितले की लातूर शहरालगत मंडळाने विकसीत भूखंडाची योजना प्रस्तावित करण्यासाठी योग्य अशा जमिनी कलम-५२ खाली घेण्याचे प्रस्ताव संबंधीत कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांचेकडून मागविण्यांत येतील.

५. मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी प्रतिपादन केले की, लातूर येथे मंडळाच्या विभागीय कार्यालयासाठी व विश्रामगृह बांधणेसाठी योग्य अशी जागा विकत घेवून पूढील कार्यवाही करावी. याबाबत लातूर शहरातील कार्यालयासाठी योग्य अशी जमिनीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडून मागविण्यांत येईल व त्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.

६. मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी सांगितले की, एमआयडीसी, लातूर येथे गोरगरिबांना व हमालमापाडी वर्गांना घरे बांधून देण्यासाठी एमआयडीसी ची ३० हेक्टर जमिन तातडीने खरेदी करण्यांत यावी. याबाबत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, एमआयडीसी लातूर येथिल ठोस मागणी घेण्यांत येईल असे सांगितले.

७.मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी प्रतिपादन केले की, औसा (जि. लातूर) येथे एमआयडीसी ची किमान १०.०० एकर जमिन मंडळाची गृहनिर्माण योजना राबविणेसाठी खरेदी करण्याची कार्यवाही करावी. या बाबतीत मुख्य अधिकारी यांनी मंडळास माहिती दिली की, औसा येथे गृहनिर्माण योजना ठोस मागणी प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे मागणीनुसार एमआयडीसीची जमिन औसा येथे घेणे बाबत प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविण्यांत येईल.

८.मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी सांगितले की, लातूर शहरात भारत निर्मल अभियान योजने अंतर्गत ३० झोपडपट्टयात (एका झोपडपट्टीत २० प्रमाणे) ६०० स्वच्छतागृहांचे सुविधा पुरविण्यासाठी कार्यवाही करावी. याबाबत पूढील योग्य ती कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी अभियंता लातूर यांनी सूचना देण्यांत येतील असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

९.मा.सदस्य श्री.वाघचौरे यांनी प्रतिपादन केले की, पैठण तालुक्यात खालील ठिकाणी (ग्रमीण भागात) गृहनिर्माण योजना राबविणेसाठी कार्यवाही करावी.
१. चित्तेगांव २. बिडकीन. ३. लोहगांव. ४. बालानगर. ५. विहामांडवा. ६. पाचोड. ७.अडूळ. ८. पैठण.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, उपरोक्त गावाच्या ठिकाणी गृहनिर्माण योजनेसाठी उपयुक्त अशा (शासकीय / खाजगी) जमिनीच्या उपलब्धतेबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता / उप अभियंता यांचेकडून अहवाल घेण्यांत येईल तद्नंतर प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठवून पूढील कार्यवाही करण्यांत येईल. ग्रमीण भागात गृहनिर्माण योजनेऐवजी विकसित भूखंडाची योजना राबविणेबाबत प्राधिकरणाचे निर्देश असल्याचे सांगितले.

१० मा.सदस्य श्री.इनामदार व श्री.सावे यांनी प्रतिपादन केले की,मुरुड येथिल म्हाडाचे घरकुल योजनेलगत शासकीय जमिनीतून "इदगाहसाठी" जमिन देणेसाठी जिल्हाधिकारी, लातूर यांनी मंजूरी दिली आहे परंतु मंडळाच्या योजनेलगतची शासकिय जमिन "इदगाहसाठी" देणेसाठी म्हाडाची त्यास ना हरकत प्रमाणपत्र लागते व तसा प्रस्ताव मंडळाचे कार्यालयात आला आहे, करिता "ना हरकत प्रमाणपत्र " देण्यात यावे. सदर प्रकरणात योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यासाठी कार्यवाही करण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी सांगितले.

११. मा.सदस्य श्री. इनामदार व श्री.सावे यांनी प्रतिपादन केले की, लातूर शहरात खालील ठिकाणी कलम-५२ खाली मंडळाने जागा / जमीन घेण्याची कारवाई करावी व तेथे गृहनिर्माण योजना किंवा विकसीत भुखंड योजना राबवावी.१.लिंबगांव २. वाघाळा (राडी ) ३. सायगांव. ४. तळेगांव (घाट ) ५. घाट नांदूर ६. उजनी. ७.पट्टी वडगांव ८. चनई.

याबाबतीत मुख्य अधिकारी यांनी बैठकीत सांगितले की, उपरोक्त ठिकाणी शासकीय जमिनीच्या उपलब्धतेबाबतचा अहवाल संबंधित कार्यकारी अभियंता यांचेकडून घेण्यांत येऊन त्याप्रमाणे शासकीय जमिनी शासनाकडून उपलब्ध करुन घेण्यासाठीची रितसर प्रस्ताव तयार करण्यांत येईल व सदरील क्षेत्र प्राप्त होत नसल्यास खाजगी क्षेत्राचा प्रस्ताव तयार करण्यांत येईल.

१२.मा.सदस्य श्री.विश्वास उपासे यांनी बैठकीत प्रतिपादन केले की, मंगरुळ (ता.तुळजापूर ) येथे मंडळाचे गृहनिर्माण योजना राबविल्यास तेथे घरकुलास मागणी मिळू शकेल म्हणून मंगरुळ येथे गांवालगत तुळजापूर अक्कलकोट राज्य मार्गावर जमिन घेतल्यास गृहनिर्माण योजना राबविता येऊ शकेल. याबाबतीत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, मंगरुळ येथिल तुळजापूर - अक्कलकोट राज्य मार्गावर गृहनिर्माणास योग्य अशा जमिनीची पाहणी करण्यासाठी कार्यकारी अभियंता यांच्याकडून अहवाल मागविण्यांत येईल व त्यानंतर जमिनीच्या योग्यतेनुसार गृहनिर्माण योजना प्रस्तावित करण्यासाठी पुढील कारवाई करण्यांत येईल.

१३. मा.सौ.शैलेजा गायकवाड सदस्या औरंगाबाद मंडळ यांनी सागितले की, मौ.गंगाखेड येथे खाजगी जमिन कलम-५२ खाली घेण्याची कारवाई प्रस्तावित आहे. परंतू सदर प्रस्तावित जमिनीच्या बाबतीत पुढील कार्यवाही प्रलंबित आहे त्यामुळे गंगाखेड येथे मंडळाची गृहनिर्माण योजना राबविल्यास तेथे घरकुलास मागणी मिळू शकेल. याबाबतीत मुख्याधिकारी यांनी सांगितले की, गंगाखेड येथे जेमिनीच्या प्रस्तावाबाबत पुढील कारवाई करण्यांत येईल.

१४. मंडळाचे मा.सदस्य श्री.वाघचौरे व सौ. शैलेजा गायकवाड यांनी प्रतिपादन केले की, वॅम्बेच्या जिल्हास्तरीय बैठकीसाठी मंडळाचे त्या-त्या जिल्हयांचे सदस्य यांना बालविले जात नाही त्यामुळे मंडळाचे त्या-त्या जिल्हयातील सदस्यांना वॅम्बे योजनेची माहिती होत नाही. याबाबत मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, वॅम्बेच्या जिल्हास्तरीय बैठकीस त्या-त्या जिल्हयांचे सदस्य यांना बोलविण्यासाठी मंडळाचे जिल्हा गृहनिम्राण अधिकारी यांना सूचना देण्यांत येतील. म्हणजे जिल्हा गृहनिर्माण अधिकारी हे मा.जिल्हाधिकारी यांचे सम्मतीने मंडळाचे त्या-त्या जिल्हयांचे सदस्यांना वॅम्बेच्या बैठकीत बोलविण्यासाठी कार्यवाही करतील.

१५. सर्व सन्माननीय सदस्यांनी सर्वानुमते सांगितले की, मंडळाची पूढील बैठक दिनांक २९/१२/२००४ रोजी ठेवण्यांत यावी.

उपरोक्त प्रमाणे पटलावरील विषयावर चर्चा झाल्यानंतर मंडळातर्फे श्री. आर.के. पाटील उप अभियंता यांनी उपस्थितांचे आभार मानले व मंडळाची बैठक समाप्त झाली असे घोषीत केले.